महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४१ वे | दिनांक : २८/०८/२०२६ | वार : शुक्रवार

## नेपाळ दुर्घटनेतील पर्यटकांच्या मदतीसाठी सरकार तत्पर - मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई :** नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या भीषण महापुराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील कैलास मानसरोवर यात्रेसह विविध कारणांसाठी नेपाळ आणि तिबेटमध्ये गेलेल्या पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार पूर्णपणे 'अलर्ट मोड'वर असून, पर्यटकांच्या सुटकेसाठी केंद्र सरकारशी चर्चा सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी MPSC परीक्षा, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन आणि मुंबईतील टॅक्सी चालकांच्या मुद्द्यावरही सरकारची भूमिका स्पष्ट केली.

पाळमधील महापुरात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांप्रती फडणवीस यांनी संवेदना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "मानसरोवर यात्रा आणि इतर कारणांसाठी महाराष्ट्रातील काही पर्यटक तिबेट आणि नेपाळमध्ये गेले आहेत. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. रेस्क्यू ऑपरेशनची पूर्ण तयारी सरकारने ठेवली आहे." अद्याप अडकलेल्यांचा अचूक आकडा हाती आला नसल्याचे फडणवीसांनी सांगितले.

नेपाळमध्ये पुराच्या परिस्थितीत अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधत त्यांच्या परिस्थितीची माहिती घेतली. "घाबरू नका, शासन तुमच्यासोबत आहे," असा धीर देत पर्यटकांना सुरक्षितपणे महाराष्ट्रात परत आणण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश दिले. त्यांच्या सुरक्षित परतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाशीही पाठपुरावा सुरू असून, नेपाळचे खासदार संदीप राणा यांच्याशीही फडणवीस यांनी चर्चा केली. महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांना सुखरूप मायदेशी आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

नुकत्याच रद्द झालेल्या MPSC परीक्षेबाबत बोलताना फडणवीस यांनी स्पष्ट केले की, शासनाला या परीक्षा 100 टक्के पारदर्शकच हव्या आहेत. "या परीक्षेत 'मास पेपर फुटी' झालेली नाही. तो पेपर पर्टिक्युलर एकाच व्यक्तीकडे गेला होता. तरीही पारदर्शकतेसाठी MPSC ने संपूर्ण परीक्षा रद्द करण्याचा घेतलेला निर्णय योग्य आणि महत्त्वाचा आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत आणि परीक्षेत आमूलाग्र सुधारणा व्हाव्यात, यासाठी सरकारने एक विशेष समिती स्थापन केली आहे, असे फडणवीस म्हणाले.

मनोज जरांगे पाटील हे 29 ऑगस्टच्या आंदोलनावर ठाम असल्याच्या प्रश्नावर बोलताना फडणवीस म्हणाले, "त्यांच्या मागण्यांवर सरकारने योग्य ती कारवाई केली असून, सरकारचे प्रतिनिधी त्यांच्या संपर्कात आहेत. महायुती सरकारने मराठा समाजासाठी जितके निर्णय घेतले आणि काम केले, तेवढे यापूर्वी कधीही झालेले नाही. भविष्यात समाजाच्या हितासाठी आणखी काही निर्णय घेण्याची गरज पडल्यास तेही घेण्याची सरकारची तयारी आहे."

## मुंबईतील मोकळ्या जागांवरून आदित्य ठाकरेंचा सरकारवर निशाणा



**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील मोकळ्या जागा आणि मैदानांच्या मुद्द्यावरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्र्यांकडून मुंबईतील मोकळ्या जागा त्यांचे आमदार आणि बिल्डर मित्रांना वाटल्या जात असल्याचा अत्यंत गंभीर आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे. तसेच, नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरावरही त्यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे.

मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले. ते म्हणाले, "गेल्या दोन आठवड्यांपासून आपण मुंबईत एक विशिष्ट 'पॅटर्न' पाहत आहोत. राज्याचे मुख्यमंत्री मुंबईतील सर्व मोकळ्या जागा, खेळाची मैदाने आणि मनोरंजन मैदाने त्यांचे आमदार, विधान परिषद सदस्य (MLC) आणि त्यांच्या बिल्डर मित्रांच्या घशात घालत आहेत. मात्र, आम्ही मुंबईच्या मोकळ्या जागा वाचवण्यासाठी लढत आहोत. ही मैदाने आणि मोकळ्या जागा भविष्यातही सर्वांसाठी कायम मोकळ्या आणि विनामूल्य राहतील, याची आम्ही नक्कीच काळजी घेऊ."

राज्याच्या प्रश्नांसोबतच आदित्य ठाकरे यांनी नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरावर आणि भूस्खलनावरही भाष्य करत संवेदना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "नेपाळमधून महापुराचे जे काही चित्र समोर येत आहे, ते अत्यंत विनाशकारी आणि हृदयद्रावक आहे. या नैसर्गिक आपत्तीत तिथे अडकलेल्या सर्व नागरिकांची लवकरात लवकर सुटका व्हावी, यासाठी आम्ही प्रार्थना करत आहोत. तसेच, या संकटातून नेपाळ लवकरच सावरेल आणि तेथील जनजीवन लवकरात लवकर पूर्वपदावर येईल, अशी आम्ही आशा करतो.

नेपाळच्या रासुवा जिल्ह्यासह तिबेटच्या सीमावर्ती भागात बुधवारी अचानक आलेल्या भीषण पुरामुळे मोठी हानी झाली. तिबेटच्या बाजूने आलेल्या प्रचंड पाण्याच्या लोंढ्याने भोटे कोशी आणि त्रिशुली नदी परिसरात अक्षरशः हाहाकार माजवला. अनेक पूल, रस्ते, घरे आणि इतर पायाभूत सुविधा वाहून गेल्या. प्राथमिक माहितीनुसार, हिमालयीन भागातील बर्फ, दगड आणि मातीच्या मोठ्या प्रमाणातील घसरणीमुळे अचानक पाण्याचा प्रचंड लोंढा निर्माण झाला. सुरुवातीला या घटनेमागे भूकंप असल्याचा अंदाज व्यक्त झाला होता; मात्र नंतर ग्लेशियरशी संबंधित घसरण हे संभाव्य कारण असल्याचे अहवाल समोर आले. या आपत्तीत मृतांचा आकडा 160च्या आसपास पोहोचला असून शेकडो लोक अद्याप बेपत्ता आहेत. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

## अमित साटम यांना भुंकायलाच ठेवलंय, ते काम ते उत्तम करतात - अमित ठाकरे



**नागपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे (मनविसे) अध्यक्ष अमित ठाकरे सध्या विदर्भ दौऱ्यावर असून, त्यांनी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत भाजप आणि राज्य सरकारवर जोरदार तोफ डागली. मुंबई भाजपचे आमदार अमित साटम यांनी राज ठाकरे यांच्या नातवाच्या शाळेवरून केलेल्या टीकेला अमित ठाकरे यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत प्रत्युत्तर दिले. "अमित साटम यांना भुंकायलाच ठेवले असून, ते त्यांचे काम अगदी उत्तम पद्धतीने करत आहेत," असा घणाघाती पलटवार अमित ठाकरे यांनी केला. नागपुरातील पाचपावली येथील सिंधू महाविद्यालयात मनविसेच्या सभासद नोंदणी मोहिमेची पाहणी केल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

अमरावती रिक्षाचालकांच्या कार्यक्रमात अमित साटम यांनी केलेल्या टीकेबाबत विचारले असता अमित ठाकरे म्हणाले की, "स्वतःच्या पक्षाच्या नेत्यांनी आणि परिवहन मंत्र्यांनी मराठी सक्तीची केल्याचे सांगितले, तरी हे लोक हिंदीत भाषण करतात. यावरूनच यांना मराठी भाषेची किती काळजी आहे हे दिसून येते. अमित साटम हा तोच माणूस आहे जो मुंबईत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे आणि झाड अंगावर पडून झालेल्या निष्पापांच्या मृत्यूवर हसला होता. लोकांच्या मृत्यूवर हसणारा माणूस माझा मुलगा कुठल्या शाळेत शिकणार हे ठरवणार का?"

"आम्ही परिस्थितीनुसार लोकांच्या दु:खात जाऊन त्यांच्याशी संवाद साधतो. पण जर कोणी आमच्या मराठी भाषेवर आले, तर आम्ही अंगावर गेल्याशिवाय राहणार नाही."

राज्यातील वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांवरून त्यांनी सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला. "पेपर फुटल्यानंतर चौकशी आणि परीक्षा रद्द करण्यापेक्षा पेपरफुटी होणारच नाही, यासाठी सरकारने काय उपाययोजना केल्या? परीक्षा घोटाळ्यांमुळे आतापर्यंत राज्यातील 20-21 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या, तरीही या सरकारला पाझर फुटला नाही."

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# प्रार्थना

देवा..
येऊ दे भरून
मिरगात आभाळ
अन् पहिल्या पावसात
होऊ दे ओलं चिंब
बळीराजाचं शेतशिवार

उगवू दे प्रत्येक दाणा
मातीच्या कुशीत पेरलेला
मिळू दे योग्य मोबदला
कष्टकऱ्यांच्या घामाला

होऊ दे पेरणी सद्विचाराची
या श्रद्धेच्या मातीत
अन् दे सबुरी प्रत्येकाला
जीवन प्रवास करताना
आशेच्या उजेडासोबत..

दे शक्ती
जीवन संघर्षात शिणलेल्या जीवाला
तग धरून उभं राहण्याची
अन् पडल्यावर पुन्हा उठण्याची..

दूर कर भीती मनातली
हटू दे काजळी निराशेची
तेवत ठेव दिवा
चिरंतन विश्वासाचा
तुझ्या लेकरांच्या मनात..

मिटू दे पापण्या अलगद
अंथरुणावर पडल्याबरोबर
सरू दे चिंता मनातल्या
थकव्या सोबत..

तुझ्यावरची श्रद्धा
राहू दे अढळ
शेवटच्या श्वासापर्यंत
मागणं..इतकंच..



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# लोक म्हणतात

कलियुगात लोक म्हणतात ,
पैशाशिवाय कुठे काय अडते?
पैसा नसले की, जगातल्या,
खऱ्या माणसाचे दर्शन घडते. १

इथे पैशाशिवाय माणसाला,
कोणीच किंमत देत नाही.
सांगा मित्रांनो! पैशाशिवाय,
बाजारात मिळत का काही ? २

मित्रांनो! पैशाशिवाय जगात,
होते माणसाचे जगणे अवघड.
पैसा नसेल जवळ जगतांना,
जीवनात पदोपदी होते परवड. ३

पैशाला सारे करतात सलाम,
जगाची रीत आहे खूप भारी,
पैसा अडका नसेल काहीच,
पाहुणे-रावळे टाळतात सारी. ४

पैसा लागतो जगण्यासाठी,
फक्त इमानदारीने ते कमवावे.
मुलाबाळांच्या शिक्षणासाठी,
पुरेल इतके सर्वांनी जमवावे. ५

मित्रांनो पैशापेक्षा माणसांना,
जगतांना दिले पाहिजे किंमत.
संकटकाळात माणसंच देतात,
सदा संकटांशी लढण्याचे हिंमत.६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांना अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचा 'शिक्षा सन्मान पुरस्कार' प्रदान



**फुलंब्री :** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर जिल्हा आयोजित 'गुरुवंदन सोहळा व शिक्षा सन्मान पुरस्कार-२०२६' आयोजन विवेकानंद महाविद्यालय समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी प्राचार्य व जेष्ठ शिक्षण तज्ज्ञ प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती लाभली. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, प्रोफेसर, डॉ. प्रवीण वक्ते व छत्रपती संभाजीनगर विभागाच्या उच्च शिक्षण सहसंचालक, प्रोफेसर, डॉ. पंकजा वाघमारे यांची तर अध्यक्षस्थानी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे प्रदेश महासचिव प्रोफेसर, डॉ दिलीप अर्जुन उपस्थित होते. या गुरुवंदन सोहळ्यानिमित्त जिल्हा परिघातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थाचालक, प्राचार्य व प्राध्यापक यांना 'शिक्षा सन्मान पुरस्कार-२०२६' हा प्राचार्य श्रेणीतील पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांना देऊन गौरविण्यात आले. यात प्राचार्य श्रेणीतील-६ प्राध्यापक श्रेणीतील-१० आणि संस्थाचालक श्रेणीतील-६ असे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या गुरुवंदन सोहळ्यासाठी जिल्हा परिघातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थाचालक, प्राचार्य व प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जगताप यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रोफेसर, डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रोफेसर, डॉ. विजय पांडे, प्रोफेसर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, श्री बाबासाहेब दाभाडे यांची उपस्थिती होती.

# अब्दुल मजीद सालार इकरा उर्दू हायस्कूल, बोरनार येथे सीरतुन्नबी कार्यक्रम उत्साहात संपन्न




**बोरनार :** इकरा एज्युकेशन सोसायटी संचलित अब्दुल मजीद सालार इकरा उर्दू हायस्कूल, बोरनार येथे सीरतुन्नबी कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी नातिया कलाम तसेच पैगंबर हजरत मुहम्मद यांच्या जीवनावर आधारित आशयपूर्ण भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आरिफ मोहम्मद खान होते. अध्यक्षीय प्रस्ताव फिरोज खान यांनी मांडला, तर मजहर खान यांनी अनुमोदन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जव्वाद अंजुम शेख यांनी प्रभावीपणे केले. सूत्रसंचालना दरम्यान त्यांनी पैगंबर हजरत मुहम्मद यांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग व आदर्शांवर प्रकाश टाकला.विद्यार्थ्यांनी सादर केले नातिया कलाम व भाषणेकार्यक्रमात नातिया कलाम व भाषणांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नाजीया दादा साहब पटेल (इयत्ता पाचवी), अफशा सदफ (इयत्ता सहावी), जकिया जहूर (इयत्ता सातवी), अल्फिया व समूह (इयत्ता आठवी), हफ्सा सय्यद रियाज (इयत्ता नववी), बुशरा गफूर पटेल व खदिजा सादिक देशमुख (इयत्ता दहावी) यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक आरिफ मोहम्मद खान यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष रोशन शेख जाफर तसेच जव्वाद अंजुम शेख व फिरोज खान यांनी संयुक्तपणे केले.अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक आरिफ मोहम्मद खान यांनी सीरत-ए-तय्यबावर सविस्तर मार्गदर्शन केले. पैगंबर हजरत मुहम्मद यांच्या जीवनातील आदर्श विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, त्यांच्या शिकवणीनुसार आचरण करावे आणि सद्गुणांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक मजहर खान, अमीर शेख, आबिद पंजारी, सादिक बागवान तसेच शिक्षकेतर कर्मचारी मुश्ताक, युसूफ व शब्बीर यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार तसेच संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी आयोजक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.कार्यक्रमाचा समारोप सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष रोशन शेख यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६


## मोबाईलच्या युगात कागद-पेनची जादू; श्रीकृष्ण विद्यालयात पत्रलेखनाचा अनोखा उपक्रम



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात पारंपरिक पत्रलेखनाची गोडी जपण्याचा अनोखा प्रयत्न श्रीकृष्ण विद्यालय, गुंजोटी येथे करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला, भावनिक अभिव्यक्तीला आणि सर्जनशीलतेला चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास ६०० पत्रांची नोंद झाल्याने उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद अधोरेखित झाला.रक्षाबंधनानिमित्त बहिणींनी भावांना, भावांनी बहिणींना, तसेच शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकांना मनातील भावना, आठवणी, शुभेच्छा आणि कृतज्ञता व्यक्त करणारी पत्रे लिहिली. त्यामुळे पत्रांच्या माध्यमातून प्रेम, आपुलकी आणि गुरु-शिष्य नात्याचा भावनिक संवाद साधला गेला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ पत्रलेखनाचा सरावच झाला नाही, तर पत्र कसे लिहावे, त्यामध्ये दिनांक, पत्ता, मायना, आशय, शेवटचा मजकूर व स्वाक्षरी यांचा योग्य वापर कसा करावा, याचेही प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळाले. तसेच पत्र पाठविताना लिफाफा, योग्य पत्ता, पिनकोड आणि टपाल तिकिटाचे महत्त्व याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. त्यामुळे पत्र लिहिण्यापासून ते ते प्रत्यक्ष पाठविण्यापर्यंतचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला.डिजिटल संदेश काही क्षणांत पोहोचत असला, तरी स्वतःच्या हस्ताक्षरातून लिहिलेले पत्र भावना अधिक जिवंतपणे पोहोचवते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शुद्धलेखन, सुंदर हस्ताक्षर, योग्य शब्दांची निवड, विचारांची मांडणी आणि प्रभावी लेखन यांचा प्रत्यक्ष सराव मिळाला. विशेष म्हणजे, जवळपास ६०० पत्रांची नोंद होणे ही विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाची आणि उपक्रमाच्या यशाची पावती ठरली. डिजिटल युगातही कागद-पेनच्या माध्यमातून भावना व्यक्त करण्याची संस्कृती जिवंत ठेवण्याचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अनुभवसमृद्ध ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्यासोबतच संवेदनशीलता, सर्जनशीलता, नात्यांची जाणीव आणि संवादकौशल्य विकसित होण्यास मदत होते. श्रीकृष्ण विद्यालयाचा हा उपक्रम आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही पारंपरिक पत्रलेखनाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक रविराज पाटील, उपमुख्याध्यापक सत्यवान भालेराव व पर्यवेक्षक अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.






## तालुक्यात पावसाने तब्बल अडीच महिने खंड दिल्याने पाण्याचे गंभीर संकट



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यावर भीषण जलसंकटाचे ढग गडद झाले असून, लघु सिंचन विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या एकूण ५९ लहान-मोठ्या तलावांपैकी तब्बल ४७ तलाव कोरडेठाक पडले आहेत! या तलावांमध्ये 'झिरो टक्के' पाणीसाठा शिल्लक राहिल्याने संपूर्ण तालुक्यात पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्याचे दिवस असूनही ऑगस्ट महिना संपत आला आहे. तलावांची ही विदारक स्थिती पाहून बळीराजा आणि ग्रामस्थ प्रचंड चिंतेत सापडले आहेत.लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद परभणी अंतर्गत लघु सिंचन उपविभाग जिंतूर यांच्या अधिकृत आकडेवारीवरून तालुक्यातील पाणीटंचाईची भयावह वास्तवता समोर आली आहे. तालुक्यात एकूण १६ सिंचन तलाव, २१ पाझर तलाव, २० गाव तलाव आणि २ इतर तलाव असे एकूण ५९ तलाव आहेत.पाझर अन् गाव तलावांची अवस्था बिकट!सर्वात धक्कादायक बाब म्हणजे तालुक्यातील २१ पाझर तलावांपैकी १९ तलाव पूर्णपणे कोरडे पडले आहेत. केवळ 'कुहाडी' (३०%) आणि 'जांब बु.' (१०%) या दोनच पाझर तलावांत नावाला पाणी उरले आहे. तर दुसरीकडे, २० च्या २० गाव तलावांमध्ये पाण्याचा एक थेंबही शिल्लक नसून सर्व २० गाव तलाव 'झिरो टक्क्यांवर' आले आहेत.सिंचन तलावांचाही तळ दिसू लागला!तालुक्यातील १६ सिंचन तलावांपैकी चामणी, साखरतळा, जिंतूर ३ आणि अंबरवाडी या ४ महत्त्वाच्या तलावांचा पाणीसाठा शून्य टक्क्यांवर आला आहे. उर्वरित १२ सिंचन तलावांमध्येही जेमतेम १० ते ५० टक्केच पाणीसाठा शिल्लक असून पाणीपातळी झपाट्याने खाली जात आहे. जिंतूर तालुक्यातील तलाव आणि पाणीसाठ्याचा 'पंचनामा'! एकूण तलाव : ५९ • 'झिरो' पाणीसाठा असलेले तलाव : ४७ विभागवार वस्तुस्थिती : १. सिंचन तलाव (एकूण १६) : - ४ तलाव पूर्ण कोरडे (०% साठा) - १२ तलावांत १०% ते ३०% दरम्यान जेमतेम साठा २. पाझर तलाव (एकूण २१) : - १९ तलाव 'झिरो' टक्क्यांवर - केवळ २ तलावांत नावाला पाणी (कुहाडी ३०%, जांब बु. १०%) ३. गाव तलाव (एकूण २०) : - सर्वच्या सर्व २० गाव तलाव पूर्ण कोरडेठाक! बळीराजाची चिंता वाढली! पावसाने मारलेली ताण आणि तलावांतील ठणठणाट यामुळे जिंतूर तालुक्यावर मोठे संकट आले आहे. शासनाने आणि प्रशासनाने तातडीने उपाययोजना आखून पाणीटंचाईवर मात करण्याची जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे. प्रशासकीय अनास्था की निसर्गाचा कोप? गावागावांतील विहिरी, बोअरवेलची पाणीपातळी प्रचंड खालावली आहे. जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट होत चालला आहे. जिंतूर तालुक्यातील ४७ तलावांचा तळ उघडा पडलेला असताना, प्रशासनाकडून जलसंरक्षण आणि टंचाई निवारणासाठी तातडीच्या उपाययोजना कधी राबवल्या जाणार? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६


## प्रेषित मुहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनानिमित्त २८ ऑगस्टला भव्य रक्तदान शिबिर

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : ईद ए मिलादुन नबी सण म्हणजेच प्रेषित मुहम्मद पैगंबर सल्ललाहु सलैहि व सल्लम यांच्या १५०१ व्या जन्मदिनानिमित्त जिंतूर सकल मुस्लिम समाजाच्या वतीने शुक्रवारी, २८ ऑगस्ट रोजी जामा मस्जिद परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ०९ ते ६ वाजेपर्यंत हे शिबिर होणार असून, समाजबांधवांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. रक्तदान हे केवळ सामाजिक कर्तव्य नसून, गरजू रुग्णांच्या जीवनाला आधार देणारे श्रेष्ठ दान मानले जाते. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेले रुग्ण, प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज भासणाऱ्या माता तसेच विविध आजारांवरील उपचार घेत असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशा प्रसंगी रक्तपेढ्यांमध्ये पुरेसा रक्तसाठा उपलब्ध असणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.रक्ताची गरज ही कोणत्याही धर्म, जात किंवा पंथाचा विचार न करता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रक्तदानाच्या माध्यमातून माणुसकीचा संदेश देत गरजूंच्या मदतीसाठी पुढे येणे आवश्यक आहे. एका व्यक्तीने केलेले रक्तदान अनेकांच्या जीवनासाठी उपयोगी ठरू शकते. त्यामुळे तरुणांसह पात्र नागरिकांनी रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.रक्तदान शिबिरात येताना नागरिकांनी वेळेचे नियोजन करून सकाळी ०९ ते ०६ या वेळेत उपस्थित राहावे. अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान करून या सामाजिक उपक्रमाला हातभार लावावा आणि प्रेषित मुहम्मद पैगंबर सल्ललाहु सलैहि व सल्लम यांच्या १५०१ व्या जयंतीचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

माणुसकीचा संदेश कृतीतून देण्याचे आवाहन सकल मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## उच्च शिक्षणाशिवाय वैज्ञानिक दृष्टिकोन अशक्य, वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सूर




**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन आणि शहीद नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनाबद्दल रंगलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आजच्या जेनझीने , तरुणांनी उच्च शिक्षणातूनच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होईल असा सूर धरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण विषयक विचार , माझ्या उच्च शिक्षणातील अडथळे व त्यावरील उपाय ,शहीद नरेंद्र दाभोळकर कार्य आणि कर्तृत्व, माझा - आजच्या युवकांचा अंधश्रद्धा निर्मूलनातील सहभाग काही गावाकडील अनुभव अशा विषयावर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम बक्षीस सुनील सुभाष धनराज बीए तृतीय वर्ष तर द्वितीय पारितोषिक विकास सिताराम कांबळे बीए तृतीय वर्ष, प्रकाश दत्ता जाधव एम ए प्रथम वर्ष आणि रवी वैजनाथ सभादिंडे बीए तृतीय वर्ष यांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली . प्रारंभी विद्यापीठाच्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले , यात विदयार्थी , कर्मचारी व सर्व प्राध्यापकवृंदांनी सहभाग घेतला. सदर स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नवनाथ गोरे हे होते यावेळी उपप्राचार्य प्राध्यापक एन एम करडे यांनी विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेतील विविध कौशल्य विषयी मार्गदर्शन केले तसेच विद्यापीठ वर्धापन दिनामागची पार्श्वभूमी विशद करत ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञान अवगत करणारी माणसेच देशाला समाजाला पुढे नेतील.

अंधश्रद्धा निर्मूलनात युवकांनी आपले योगदान द्यावे असे त्यांनी आवाहन केले. सदर स्पर्धेसाठी डॉ. प्रेमराज वाघमारे यांनी परीक्षक म्हणून कार्य केले. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप गवई यांनी केले शेवटी आभार डॉ. गौतम घाडगे यांनी व्यक्त केले.

## शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड येथे आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रेड रिबन क्लबचे उद्घाटन




**कन्नड** : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व जिल्हा एड्स प्रतिबंध पथक जिल्हा रूग्णालय छत्रपती संभाजीनगरतसेच ग्रामीण रुग्णालय कन्नड, रेड रिबनक्लब तर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिन व पंधरवडा निमित्त जनजागृतीपर व्याख्यान दि. 27-08-2026रोजी आयोजित करण्यात आले होते त्यानिमित्त रेड रिबन क्लबचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील आयसीटीसी समुपदेशक श्री.संजय सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले यानिमित्त त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती दिली. ग्रामीण रूग्णालयाचे श्री शशिकांत गांगुर्डे यांनी एड्स तपासणी विषयक सविस्तर मार्गदर्शन केले ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ. मगर बी.के. हे होते. त्यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या प्रसंगीरेड रिबन क्लब चे अध्यक्ष कु. मयुरी पवार उपाध्यक्ष रोहित क्षीरसागर सर्व सदस्य कमलेश कदम साक्षी धनेधर पुजा चव्हाण उपस्थित होते. ह्या कार्यक्रमासाठी महाविद्यलयाचे प्राचार्य मा. डॉ. व्ही. एन. भोसले, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय कन्नड जिल्हा एड्स नियंत्रण पथक प्रकल्प समन्वयक ह्यांचे सहकार्य मिळाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेड रिबन क्लब चे समन्वयक डॉ. पी.के.संघई ह्यांनी केले. ह्या प्रसंगी महाविद्यलयचे डॉ. महाजन , डॉ. साखरे उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार डॉ. महाजन ह्यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६


## ग्रामीण भागातील युवतींच्या स्वसंरक्षणासाठी जयभवानी महाविद्यालयाचा पुढाकार



**पाटोदा :** ज.भ.शि.प्र. मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने विद्यार्थिनींसाठी तीन महिन्यांच्या कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर' दि. १ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.शिबिराचे उद्घाटन दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढीचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते. प्रमुख पाहुणे व कराटे प्रशिक्षक श्री. कंकरसिंग टाक, सहाय्यक प्रशिक्षक कु. मयुरी धनंजय जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. सोमनाथ घाडगे तसेच अंतर्गत मूल्यांकन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक उपस्थित होते.अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या पीठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा, उद्देश व उपस्थित मान्यवरांची ओळख करून दिली. विद्यार्थिनींमध्ये आत्मसंरक्षणाची भावना निर्माण करणे, शारीरिक तंदुरुस्ती वाढविणे, आत्मविश्वास विकसित करणे तसेच संकटाच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करून देणे, हा या प्रशिक्षण शिबिराचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, "आजच्या काळात विद्यार्थिनींनी केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम असणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये आत्मसंरक्षणाची जाणीव आणि आत्मविश्वास असणेही आवश्यक आहे. कराटे प्रशिक्षणामुळे शारीरिक क्षमता, मानसिक बळ, शिस्त आणि संकटांचा सामना करण्याची तयारी विकसित होते. महाविद्यालयाने राबविलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे."प्रमुख पाहुणे व कराटे प्रशिक्षक श्री. कंकरसिंग टाक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "कराटे ही केवळ मार्शल आर्ट नसून आत्मसंरक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. नियमित सरावामुळे शरीराची ताकद वाढण्याबरोबरच मनाची एकाग्रता, आत्मविश्वास आणि प्रसंगावधान विकसित होते." यावेळी त्यांनी विद्यार्थिनींना कराटेच्या विविध तंत्रांचे प्रात्यक्षिक करून दाखविले व मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे म्हणाले की, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच शारीरिक व मानसिक सक्षमीकरण आवश्यक आहे. विशेषतः विद्यार्थिनींमध्ये आत्मसंरक्षणाची कौशल्ये विकसित करण्यासाठी या प्रशिक्षण शिबिराचा निश्चितच फायदा होईल. विद्यार्थिनींनी या संधीचा पुरेपूर उपयोग करून प्रशिक्षण सातत्याने पूर्ण करावे आणि आत्मविश्वासाने प्रत्येक परिस्थितीचा सामना करावा."कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले, तर प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले. शिबिराच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. तीन महिन्यांच्या या प्रशिक्षणातून विद्यार्थिनींना कराटेच्या विविध तंत्रांसोबतच आत्मसंरक्षण, शिस्त, एकाग्रता आणि आत्मविश्वासाचे धडे मिळणार आहेत.

*ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण व कौतुकास पात्र ठरत आहे. या उपक्रमामुळे महाविद्यालयाचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे*

## तरुणा क्रांतीचा हुंकार हो

मशालीसारखा पेटून उठ,
आता अन्यायाला तोडून उठ!
गुलामीचे हे पाश उधळण्या,
अनवाणी पायांनी धावून उठ!

मौन धरून का बसला आहेस?
शब्दांची तू धार बनव,
ज्यांनी दाबला आवाज तुझा,
त्यांच्या काळजात धडकी भरव!


काळोखाच्या साम्राज्याला,
आता तूच आग लाव,
तुझ्या हक्काच्या लढाईला,
आज नवा तू रंग दे!

युगायुगांची ही लाचारी,
आता क्षणात भस्म कर,
सोसल्या मनातील तीन्ही सांजा,
आज उन्हाचे वादळ कर!

मुक्या वेदनांचा टाहो बनून,
गर्जत ये तू मैदानात,
भिऊ नको या अंधाराला,
मशाल घे रे हातात!

नको उराशी तेच अश्रू,
नको ती शांततेची गाथा,
अन्यायापुढे झुकणार नाही,
आज पुन्हा हा स्वाभिमानी माथा!

फाडून टाक ती विषमतेची पाने,
लिही नवा इतिहास आज,
तुझ्याच क्रांतीच्या हुंकाराने,
डगमगेल जुलमी सिंहासन अन् राज!



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## तरुणपणात मित्रांनो!

सांगतो मी आज माझ्या,
पहिल्या प्रेमाची कहाणी.
वाटत होते मनाला नेहमी,
होईल तीच माझी राणी. १

तिच्यासाठी रोज मी,
ताजे गुलाब तोडत.
गुलाब घ्यावे म्हणून,
रोज प्रेमपत्र धाडत. २

लपून,छपून पाहणे,
रोज रोज चालायचे.
वाटत होते मला पण,
रोज तिला बोलायचे. ३

तिचे चोरून पाहणे,
वाटायचे मला होकार.
भावाच्या भीतीपोटी,
तिने दिले मला नकार. ४

तोडलेले सारे गुलाब,
अनेकदा सुकून गेले.
तिने नकार देताक्षणीच,
मनातून निश्चय केले. ५

प्रेम मिळवायचे असेल तर,
जीवनात यशस्वी व्हायचे.
तरुणपणात मित्रांनो सदा,
प्रेमापासून दूर राहायचे. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## एका महिन्यातच भूमिगत नालीची दुरवस्था; तक्रार करूनही प्रशासनाची डोळेझाक?




**जडगांव :** शासनाच्या निधीतून जनतेच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या भूमिगत सिमेंट काँक्रीट नाली बांधकामाची अवघ्या एका महिन्यातच दुरवस्था झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निकृष्ट बांधकामाबाबत तक्रार अर्ज देऊन तब्बल एक महिना उलटला असूनही प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.जडगांव येथील दलित वस्तीमध्ये ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेल्या भूमिगत नाली बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप असून, कामाची गुणवत्ता व प्रत्यक्ष खर्च याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी व संबंधित कंत्राटदारांविरुद्ध कठोर कारवाई तसेच आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात ॲड. सुनील बगाटे यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. मात्र तक्रार देऊन एक महिना उलटूनही कोणतीही ठोस चौकशी किंवा कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे."तक्रार करूनही प्रशासन गप्प का? संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना पाठीशी घातले जात आहे का?" असा संतप्त सवाल आता जडगांव ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे.जनतेच्या करातून मिळालेला शासनाचा निधी हा विकासकामांसाठी असतो. मात्र अवघ्या एका महिन्यात बांधकामाची दुरवस्था होत असेल, तर कामाची गुणवत्ता तपासणारे अधिकारी, मोजमाप करणारे कर्मचारी आणि देयके मंजूर करणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास निकृष्ट काम करणाऱ्यांना अप्रत्यक्षपणे संरक्षण मिळत असल्याचा संदेश जनतेमध्ये जात आहे.याबाबत ॲड. सुनील बगाटे यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देताना म्हटले, "प्रशासनाला जर जनतेच्या पैशातून दर्जेदार विकासकामे करून घ्यायची नसतील आणि निकृष्ट कामांकडे डोळेझाकच करायची असेल, तर शासनाने दिलेला निधी थेट अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या खात्यावरच खर्च करण्यासाठी द्यावा.

किमान जनतेचा पैसा अशा निकृष्ट कामांमध्ये वाया जाणार नाही."तक्रार अर्जाला एक महिना उलटूनही कारवाई नाही; आता तरी प्रशासन जागे होणार का? असा सवाल जडगांव ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात असून, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६

# भारतीय समाजव्यवस्था आणि आंबेडकरी विचारमूल्यांचा शोध




भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करणाऱ्या प्रत्येक गंभीर अभ्यासकाला एक प्रश्न नेहमीच सतावत असतो: ज्या परंपरेने हजारो वर्षांपासून आपल्याच लाखो बांधवांना पद्धतशीरपणे अमानुष विटंबना आणि अपमान सोसण्यास भाग पाडले, अशा परंपरेत अंतर्गत सुधारणा करणे खरोखरच शक्य आहे का? की ती मुळापासूनच मोडून काढावी लागेल? एक निष्णात कायदेतज्ज्ञ, प्रकांड पंडित, भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार आणि भारतातील जातीव्यवस्थेचे सर्वात निर्भीड व अचूक निदान करणारे विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याचे अत्यंत स्पष्ट आणि तितकेच वेदनादायी उत्तर दिले आहे— ते म्हणजे, केवळ 'सुधारणा' पुरेशी नाही. आज गरज आहे ती आपल्या नैतिक जीवनाच्या संपूर्ण व्याकरणामध्येच एक मोठी क्रांती घडवून आणण्याची. बाबासाहेबांनी सामाजिक परस्पर संवादाचे नियम (Rules of social interaction) आणि नैतिक तत्त्वे (Moral principles) यांमधील मूलभूत फरक स्पष्ट केला आहे. सामाजिक नियम—जसे की विशिष्ट समुदायांना जोडलेली कर्तव्ये, खाण्यापिण्याविषयीचे नियम, लग्नकार्यांचे निर्बंध आणि धार्मिक विधी—यामध्ये कदाचित काही सामाजिक उपयुक्तता असू शकते किंवा ते केवळ व्यवस्था चालवणाऱ्या प्रबळ वर्गाच्या सोयीचे असू शकतात. याउलट, नैतिक तत्त्वे—जसे की समता, मानवी प्रतिष्ठा आणि बंधुभाव—ही वैश्विक असतात आणि त्यांना एक सखोल अर्थ असतो. ही तत्त्वे कोणत्याही विशिष्ट समुदायाच्या परंपरेनुसार बदलता येत नाहीत किंवा त्यांच्याशी तडजोड करता येत नाही. बाबासाहेबांच्या मते, सामाजिक नियमांनाच 'नैतिक तत्त्वे' समजण्याची गल्लत करणे, हा ब्राह्मणशाही हिंदू धर्माने भारतीय संस्कृतीवर केलेला सर्वात मोठा बौद्धिक अन्याय आहे.

हाच विचार त्यांना त्यांच्या सर्वात तीक्ष्ण विश्लेषणात्मक दाव्याकडे घेऊन जातो. धर्मशास्त्राची परंपरा—ज्यामध्ये प्रामुख्याने मनुस्मृती आणि त्यासारख्या इतर ग्रंथांचा समावेश होतो—ती कोणत्याही अर्थाने 'तत्त्वांवर आधारित धर्म' (Religion of principles) नव्हती. तो मुळात केवळ 'नियमांचा धर्म' (Religion of rules) होता. हे नियम अत्यंत कडक, श्रेणीबद्ध आणि मानवी मूल्यांची अभिव्यक्ती करण्यासाठी नसून, समाजात केवळ अशा व्यवस्थेला टिकवून ठेवण्यासाठी तयार केले गेले होते ज्याच्या शिखरावर ब्राह्मण बसले होते आणि तळाशी असलेल्या बहुजन समाजाला केवळ हक्कांपासून वंचितच ठेवले गेले नव्हते, तर त्यांचे जगणे अत्यंत गुलामगिरीचे केले गेले होते. तथापि, ज्यांना 'कनिष्ठ जाती' म्हटले गेले त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवणारे नियम—त्यांनी काय खावे, कोणाला स्पर्श करावा, कोणत्या सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करावा—या नियमांना धार्मिक मंजुरीचे (Religious Sanction) बळ दिले गेले होते. त्यामुळे या नियमांचे उल्लंघन करणे हा केवळ एक सामाजिक गुन्हा मानला जात नव्हता, तर तो एक 'धार्मिक अपराध' मानला जात असे. बाबासाहेबांच्या मते, हाच या व्यवस्थेचा मुख्य कणा होता. जेव्हा सामाजिक शोषणालाच 'पवित्र आणि धार्मिक' मानले जाते, तेव्हा त्या व्यवस्थेमध्ये अंतर्गत सुधारणा करणे अशक्य होऊन बसते; कारण शोषितांना असे सांगितले जाते की त्यांचा हा अपमान तात्कालिक नसून तो वैश्विक आहे आणि तोऐतिहासिक नसून सनातन (शाश्वत) आहे.

**अस्पृश्यतेचे वेगळे वास्तव**

अस्पृश्यतेच्या या अमानुष प्रथेचे विश्लेषण करण्यासाठी अधिक सखोल अभ्यासाची गरज होती. येथे बाबासाहेबांचे ऐतिहासिक आणि मानववंशशास्त्रीय संशोधन अत्यंत मूळ आणि क्रांतिकारी ठरते. अस्पृश्यता ही केवळ जातीच्या उतरंडीत सर्वात शेवटी असण्यामुळे निर्माण झालेली नाही, असा युक्तिवाद त्यांनी मांडला. तो एक स्वतंत्र इतिहास होता; ज्यामध्ये टोळ्यांमधून बहिष्कृत झालेल्या आणि बाबासाहेबांनी ज्यांना 'ब्रोकन मेन' म्हटले आहे, अशा समुदायांना धार्मिक विधींच्या शुद्धतेच्या नावाखाली कायमचा कलंक लावला गेला. या प्रक्रियेत 'गाईला' पवित्र मानण्याच्या प्रतीकात्मकतेचा मोठा वाटा होता. या उपेक्षित समुदायांमध्ये—काही वेळा आवडीमुळे नव्हे तर निव्वळ जगण्याच्या अपरिहार्यतेमुळे—होणारे गोमांस भक्षण (Beef-eating) हे ब्राह्मणशाही मानसिकतेत केवळ एक खाद्यसंस्कृतीचा फरक राहिला नाही, तर तो कायमच्या अपवित्रतेचा (Defilement) शिक्का बनला. या प्रक्रियेतून, केवळ तात्कालिक कारणांमुळे झालेले हे सामाजिक बहिष्कृतत्व पुढे वंशपरंपरेत बदलले. एका अशा 'अपवित्रतेच्या तत्त्वज्ञानाने' (Metaphysics of pollution) जन्म घेतला ज्याने विशिष्ट मानवी समूहाला नैतिक समाजाच्या कक्षेबाहेर फेकून दिले. बाबासाहेबांनी ठामपणे सांगितले की, केवळ वंश किंवा व्यवसाय या आधारे अस्पृश्यतेचे स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही. ती मुळात एक सामाजिक-धार्मिक निर्मिती होती आणि हे समजून घेतल्याशिवाय ती नष्ट करता येणे शक्य नाही.

**लक्षण आणि मूळ कारण यांमधील गल्लत**

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमधील तुलना या दोन्ही महान नेत्यांच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकते. गांधीजींनी अत्यंत प्रामाणिक नैतिक भावनेने अस्पृश्यतेचा निषेध केला होता. त्यांनी अस्पृश्य समाजाला दिलेले 'हरिजन'—म्हणजेच देवाची माणसे—हे नाव वंचितांना त्यांची हिरावून घेतलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवून देण्याचा एक प्रयत्न होता. परंतु, गांधीजींचा हा दृष्टिकोन त्यांच्या लाडक्या हिंदू नैतिक चौकटीच्या आतच राहिला. त्यांचा असा विश्वास होता की, जातीच्या भिंती ओलांडणारी भक्ती परंपरा हिंदू धर्मात अंतर्गत सुधारणा करण्यासाठी पुरेशी आहे. यावर बाबासाहेबांचे उत्तर अत्यंत रोखठोक होते: ते म्हणाले की, ब्राह्मणशाही सत्तेच्या संरचनेला केवळ नैतिक आवाहन करून सुधारता येऊ शकत नाही. ज्या धर्मग्रंथांनी शतकानुशतके जातीच्या शोषणाला पवित्र मानले, ते हिंदू धर्माचे दुय्यम भाग नसून त्याचा मुख्य आधार राहिले आहेत. त्यामुळे मूळ ग्रंथीय आणि संस्थात्मक पायाला धक्का न लावता केवळ लोकांच्या मानसिकतेत बदल करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे मूळ आजारावर उपचार न करता केवळ त्याच्या वरवरच्या लक्षणांवर फुंकर घालण्यासारखे आहे.

**बौद्ध धर्माचा पर्याय आणि 'नवयान'**

मग यावर बाबासाहेबांचा पर्यायी मार्ग कोणता होता? १९५६ मध्ये त्यांनी घेतलेली बौद्ध धर्माची दीक्षा हा केवळ वैतागून घेतलेला एखादा निर्णय नव्हता, तर तो त्यांच्या प्रदीर्घ आणि सखोल तत्त्वज्ञानाचा परिपाक होता. भगवान बुद्धांच्या शिकवणीने ते सर्व काही दिले जे हिंदू धर्मशास्त्राने नाकारले होते: म्हणजेच, ग्रंथप्रामाण्यापेक्षा 'विवेकवादाला' (Reason) दिलेले महत्त्व, करुणेची वैश्विक भावना आणि जन्मावर आधारित नसलेला एक समान नैतिक समाज. ऐतिहासिक बौद्ध धर्माच्या अपयशाबाबत बाबासाहेब अनभिज्ञ नव्हते; या भूमीवर बौद्ध धर्म जातीव्यवस्थेला संपूर्णपणे संपवू शकला नाही, हे त्यांना ठाऊक होते. परंतु, बौद्ध धर्माच्या वैचारिक रचनेत समाज उभारणीची मोठी संसाधने आहेत, हे त्यांनी ओळखले होते. प्रसिद्ध तत्त्वज्ञ जॉन ड्युई (John Dewey) यांच्या प्रॅगमॅटिझम (Pragmatism - व्यवहारवाद) या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांचा असा विश्वास होता की, भूतकाळ केवळ जसाच्या तसा स्वीकारण्यासाठी नसून, तो आजच्या न्याय्य आणि नैतिक गरजांनुसार पुन्हा नव्याने घडवण्यासाठी (Refashioned) असतो. त्यांचा 'नवयान' (Navayana) हा नेमका हाच विचार होता—न्यायाच्या निकषांवर घासून शुद्ध केलेला एक नवीन बौद्ध धर्म.

**धर्मनिरपेक्ष राज्याचे तत्त्वज्ञान**

या सर्व मंथनातून धर्मनिरपेक्ष राज्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण तत्त्वज्ञान समोर येते, ज्याकडे भारतीय संविधानाच्या संदर्भात आज जितके लक्ष दिले पाहिजे तितके दिले गेलेले नाही. भारतातील धर्मनिरपेक्षता ही केवळ धर्माच्या विरोधात निर्माण झालेली नाही, तर ती धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या संस्थात्मक शोषणाच्या विरोधात उभी राहिलेली आहे. परंतु, अलीकडच्या काळात ही संकल्पना केवळ दोन वेगवेगळ्या धर्मांमधील संघर्ष आणि वाद मिटवण्यापुरतीच मर्यादित ठेवली गेली आहे. भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या या चर्चेत बाबासाहेबांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी धार्मिक शोषणाच्या दुसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या बाजूला ओळखले होते—ते म्हणजे धर्माच्या नावाखाली एकाच धर्मांतर्गत चालणारे शोषण, अस्पृश्यता, बहिष्कृतता आणि उच्च जातींनी कनिष्ठ जातींचा केलेला पद्धतशीर अपमान. भारताची ही सामाजिक परिस्थिती पाहता, हा गंभीर अन्याय मुळापासून उपटून टाकण्यासाठी राज्यसंस्थेने सक्रिय हस्तक्षेप करणे अनिवार्य होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव—या मूल्यांना बाबासाहेब केवळ शब्द म्हणून नव्हे तर मूलभूत तत्त्वज्ञान म्हणून पवित्र मानत असत. त्यामुळे या मूल्यांशी कटिबद्ध असणाऱ्या कोणत्याही लोकशाही राज्याने अस्पृश्यतेसारख्या एकाच धर्मांतर्गत चालणाऱ्या शोषणाला कडाडून विरोध केलाच पाहिजे. जातीचे हे शोषण म्हणजे केवळ वैयक्तिक श्रद्धेचा भाग नव्हता की ज्याला 'धार्मिक स्वातंत्र्या'च्या नावाखाली जपावे; तर ती सत्तेची एक अशी जुलमी रचना होती जी धार्मिक नियमांच्या आधारे सामान्य माणसावर लादली गेली होती. म्हणूनच, आपल्या लोकशाही राज्याला या जातीव्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचा पूर्ण अधिकार असून ती नष्ट करणे हे त्याचे आद्य कर्तव्य आहे.

**निष्कर्ष**

थोडक्यात सांगायचे तर, बाबासाहेबांच्या कार्यातून निर्माण झालेली ही नैतिक दूरदृष्टी भारतीय प्रजासत्ताकाने आपल्या संविधानाच्या पुस्तकात जितकी जपली आहे, तितकी ती आजही आपल्या दैनंदिन वास्तवात उतरलेली नाही. त्यांना हे चांगले ठाऊक होते की, मानवी प्रतिष्ठा (Human Dignity) ही केवळ एक भावना नसून ते एक राजकीय आणि सामाजिक यश आहे—जे अत्यंत नाजूक आहे आणि त्याला टिकवून ठेवण्यासाठी भक्कम संस्थात्मक रचना व सतत जागृत राहण्याची (Perpetual Vigilance) गरज आहे.आज बाबासाहेबांच्या विचारांशी संवाद साधणे म्हणजे केवळ एका ऐतिहासिक नेत्याचे स्मरण करणे नव्हे, तर आपल्यासमोर असलेल्या एका अत्यंत ज्वलंत आणि तातडीच्या मागणीला सामोरे जाणे आहे: ती मागणी म्हणजे—आपल्याला लाभलेल्या वारशाचे मूल्यमापन तो किती 'जुना' आहे यावरून न करता, तो किती 'न्याय्य' आहे यावरून झाले पाहिजे; आणि जो वारसा न्यायाच्या कसोटीवर उतरत नाही, मग तो कितीही पवित्र का असेना, तो झटकून टाकण्याचे धैर्य आपण दाखवले पाहिजे.

**लेखक: राजीव भार्गव हे प्रख्यात**
राजकीय विश्लेषक व विचारवंत
भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे,
समाजशास्त्र विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना साभार: फ्रंटलाईन

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६


# 'कुणी घर देता का रे? घर?'

**ज**सं जसं वय वाढत जातं, तसं तसं आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलत जातो. काळ पुढे सरकत असताना अनुभवांची शिदोरी वाढत जाते आणि त्या अनुभवांमधून जीवनाचा खरा अर्थ हळूहळू उमगत जातो. तरुणपणी अनेक गोष्टींना आपण आनंदाचे मोजमाप मानतो. मोठं घर, भरपूर पैसा, महागड्या वस्तू, सतत बाहेर फिरणं, लोकांमध्ये नाव आणि प्रसिद्धी मिळवणं, प्रत्येक ठिकाणी आपली प्रशंसा होणं—हेच जणू सुखी आयुष्याचं लक्षण आहे, असं वाटत राहतं.पण आयुष्याचा प्रवास जसजसा पुढे जातो, तसतसं वास्तव अधिक स्पष्टपणे दिसू लागतं. पैसा आवश्यक आहे, मोठं घर असणं चुकीचं नाही आणि सुखसोयींची इच्छा असणंही गैर नाही; पण या सगळ्या गोष्टी असूनही मन अस्वस्थ असेल, नात्यांमध्ये विश्वास नसेल आणि जीवनात सतत तणाव असेल, तर बाहेरचं वैभवही फिकं वाटू लागतं.अनुभव माणसाला हळूहळू शिकवतो की खरा आनंद हा खूप साध्या गोष्टींमध्ये दडलेला असतो. सकाळी शांतपणे जाग येणं, मनावर कोणतंही ओझं नसणं, आपल्या कष्टाने आणि प्रामाणिकपणे मिळवलेल्या पैशावर समाधानाने जगणं, कुटुंबातील माणसांशी प्रेमाने बोलणं आणि दिवसाच्या शेवटी शांत मनाने झोपता येणं—यापेक्षा मोठं सुख कदाचित दुसरं कोणतंही नाही.वय वाढल्यानंतर माणसाला लोकांची संख्या नव्हे, तर नात्यांची गुणवत्ता महत्त्वाची वाटू लागते. शेकडो लोक आपल्या आजूबाजूला असण्यापेक्षा काही मोजकी, खरी आणि विश्वासू माणसं आयुष्यात असणं अधिक मौल्यवान वाटतं. जे लोक आपल्या आनंदात आनंदी होतात, दु:खाच्या काळात आधार देतात आणि विनाकारण आयुष्यात गोंधळ निर्माण करत नाहीत, अशा माणसांची किंमत काळाबरोबर अधिक जाणवते.पूर्वी प्रत्येक गोष्टीला उत्तर देणं आवश्यक वाटतं. प्रत्येक टीकेला प्रत्युत्तर द्यावंसं वाटतं आणि प्रत्येक वाद जिंकावासा वाटतो. पण अनुभव शिकवतो की प्रत्येक प्रश्नाचं उत्तर द्यायलाच हवं असं नाही आणि प्रत्येक वाद जिंकणं म्हणजे आयुष्य जिंकणंही नाही. अनेक वेळा शांत राहणं हेच सर्वात मोठं उत्तर असतं. काही लोकांना आणि काही परिस्थितींना आपल्या आयुष्यातून शांतपणे दूर करणं हेसुद्धा मन:शांतीसाठी आवश्यक असतं.प्रामाणिकपणे कमावलेला पैसा हा माणसाला केवळ आर्थिक आधार देत नाही, तर आत्मिक समाधानही देतो. चुकीच्या मार्गाने मिळालेल्या संपत्तीपेक्षा कमी असला तरी कष्टाने आणि इमानदारीने मिळवलेला पैसा अधिक सुख देतो. कारण त्या पैशामागे अपराधीपणाची भावना नसते; असते ती मेहनतीची ताकद आणि स्वाभिमानाची उंची.खरं तर आयुष्य सुंदर करण्यासाठी नेहमीच मोठ्या गोष्टींची गरज नसते. एक शांत सकाळ, आवडत्या माणसाबरोबर मनमोकळ्या गप्पा, साधं पण प्रेमाने भरलेलं जेवण, आपल्या माणसांच्या चेहऱ्यावरचं हास्य आणि कोणाचंही वाईट न करता जगल्याचं समाधान—यामध्येच जीवनाचं खरं सौंदर्य दडलेलं आहे.शेवटी आयुष्याला दिखाव्यापेक्षा मन:शांती अधिक सुंदर बनवते. लोकांना प्रभावित करण्यासाठी जगण्यात आयुष्य संपून जाऊ शकतं; पण स्वत:च्या मनाला शांत ठेवण्यासाठी जगण्यात आयुष्याला खरा अर्थ मिळतो. म्हणूनच वय वाढतं तसं माणूस हळूहळू कमी गोष्टींमध्ये अधिक आनंद शोधायला शिकतो.मोठं घर असण्यापेक्षा मनात शांतता असणं महत्त्वाचं, भरपूर पैसा असण्यापेक्षा तो प्रामाणिकपणे कमावलेला असणं महत्त्वाचं आणि आयुष्यात खूप लोक असण्यापेक्षा काही खरी माणसं असणं अधिक महत्त्वाचं.कारण शेवटी माणूस किती जगला यापेक्षा, तो किती शांत आणि समाधानी जगला—हेच त्याच्या आयुष्याचं खरं यश असतं.



**प्रा. डॉ. सतिश लिला नामदेव दोडके,**
ठाणे

# सुरेश साबळे यांचे :-एक निष्ठावंत चिंतन चिकित्सक भाष्य




आंबेडकरी विचारांचे कार्यकर्ते कवी समीक्षक साहित्यिक सुरेश प्रल्हाद साबळे साहेब यांच्या चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचनांचा हा तत्कालीन ते समकालीन परिप्रेक्ष्यातील वास्तवाचे सम्यक दृष्टी देणारे हे 'परिवर्तनवादी चळवळी - चिंतन आणि प्रबोधन.या विषयी आजच्या परिवर्तनवादी चळवळी व त्या अनुषंगाने त्यांचे चिंतन तर आहेच पण एक आंबेडकरी विचारांचे धारदार निर्धारक प्रबोधन यात मांडले आहे.ही एक निस्सीम वैचारिक अभ्यासपूर्ण विवेचनाची विचार शिदोरी आहे.आयु.साबळे हे मुळात वैचारिक क्रांतीचे परिवर्तनवादी कवी व आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते साहित्यिक भाष्यकार आहेत.प्रस्तूत ग्रंथ हा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी घेऊन आलेली ही निष्ठावंत कार्यकर्ते साहित्यिक भाष्यकार यांच्या लेखणीतून आलेले चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचन आहे.जसे'बुध्द सिध्दांतातील सद्धम्माविषयी चिंतन.नैतिक मूल्यांचे संवैधानिक शिक्षण देणारा बौध्दधम्म,या भाग १मध्ये सत्यशोधक समाज,मानव कल्याणकेंद्री बहुआयामी आंबेडकरी चळवळ, भीमशक्ती, मानसिक व सामाजिक परिवर्तन आणि शिवधर्म, भारतीय संविधान: संविधान संस्कृती आणि समाजपरिवर्तनातून या संवैधानिक संविधान परिवर्तनवादी चळवळी भूमिका अतिशय चिंतन आशय संपन्नतेने लेखकांनी मांडली आहे.तथागत भगवान गौतम बुद्ध व बौध्दीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ही सविनय निर्धारक लेख मालिका आहे.या वैचारिक चिंतनाची भूमिका विशद करताना ते लिहितात "मानवी कल्याणाचा विचार पेरणाऱ्या आंबेडकरी परिवर्तनवादी चळवळी, बुद्ध फुले शाहू आंबेडकर यांच्या विचार स्वप्नातील कार्य आणि नंतरच्या काळात त्यांच्या विचारांवर निष्ठेने, बांधिलकीतून कार्यरत चळवळीत बाबत यात चर्चा केली आहे.विविध आशयाचे लेखन असलेतरी 'फुले शाहू आंबेडकरी' विचारकेंद्री तथा त्या विचारांच्या चळवळीत संबंधित साहित्याचा समावेश आहे "(पृ १९) या वैचारिक क्रांतीचे मंथन असे आहे.भाग २-साहित्य यामध्ये 'आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्य चळवळीची वाटचाल' हा अतिशय मौलिक अधिष्ठान प्राप्त करून देणारा लेख.'आंबेडकरी रंगभूमी आणि सामाजिक बांधिलकी' ही एक सृजनशील अभ्यासकांची नोंद ऐतिहासिक दस्तऐवज ठरावा अशी आहे.'विद्रोही सजग जाणिव:- आंबेडकरवादी कवयित्रीचे काव्यलेखन'या लेख नव्या व जुन्या जाणत्या काव्य मिमांसात्मक लेखाजोखा मांडला आहे.कवयित्रीची विद्रोही मनोभूमिकेतून ही सजग भान जागृत करणारी ठणक व्यक्त झाली आहे.तद्वतच ज्या मायभूमीशी आपले बोली शैलीने समृद्धता मिळाली आहे.त्या मराठी साहित्य मध्ये वऱ्हाडी भाषेचे योगदान हा लेख अतिशय मर्मबंधी ठेव झाला आहे.श्रध्देय गुरुवर्य डॉ गंगाधर पानतावणे म्हणजे आंबेडकरी अस्मितादर्श वाड्मयीन व सांस्कृतिक चळवळ हा आंबेडकरी दलित साहित्यातील सर्वोत्तम ऐतिहासिक लढा तर होतांच पण मराठी भाषा ही दलित आंबेडकरी भाषेने समृद्ध केली.फुले -आंबेडकरी साहित्य - सांस्कृतिक चळवळीतील बुलढाणा जिल्ह्याचे योगदान तत्कालीन व समकालीन नोंद अतिशय उत्तम आली आहे.भाग ३-प्रबोधन या माध्यमातून सामाजिक सांस्कृतिक व जनजागृती व बौद्धीसत्व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची संवैधानिक प्रजासत्ताक संविधानाचे शिल्पकार.म्हणून 'समाज प्रबोधनाची चळवळ 'सत्यशोधक जलासा' ही मानवी मनाच्या उथानाची प्रखर वास्तववादी क्रांतीचे बीजारोपण करणारी चळवळ म्हणजे भीमशक्तीच्या विचारांची पेरणी होती.तर यांचे नामाभिधान होऊन 'सामाजिक प्रबोधनाचा सांस्कृतिक आविष्कार:- आंबेडकरी जलसा.यात आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान याला साहित्य सांस्कृतिकतेची जोड देऊन शिक्षण संजीवनी हा सत्यनिष्ठ जोड आहे.'समाज विकासाची प्रेरणाभूमी:-माणगाव परिषद' लेखात डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची स्फूर्ती देणारा चिरंतन झरा दाखवून दिला आहे.'मराठी वृत्तपत्रसृष्टीतील पाक्षिक:- 'मुकनायक' दलित उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी युगानुयुगे च्या मुक्याना या मुळनिवाशीयांना या भूमीचे नायक केले.स्वातंत्र्य,समता, न्याय बंधुता लोकशाहीचे निळे आकाश दिले. 'डॉ बाबासाहेब आंबेडकर:- जागतिकीकरण आणि भारतातील कामगार विश्व 'तसेच महाराष्ट्रातील कामगार चळवळीची अभ्युदय दिशा देण्याचं काम बाबासाहेबांच्या कामगार कायद्याने दिले आहे.बुलढाणा जिल्ह्यांस डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटी गाठी हा एक व्यापक सामाजिक संदर्भ या लेखात आहे तत्कालीन सामाजिक राजकीय संदर्भ अत्यंत महत्त्वाचे आहेत.या संपूर्ण ग्रंथाची साक्षेपी आधारभूत साधने हा मौलिक संदर्भ आहे.त्यामुळे या ग्रंथाची निर्मिती आमुल्य आहे.ख्यातनाम समीक्षक डॉ श्रीपाल सबनीस यांची दीर्घ प्रस्तावना लाभली आहे त्यातील काही अंश असा"आज बौद्ध धम्माचे आकर्षण जगभरातील लोकांना वाटत आहे; पण 'पारंपरिक बौद्ध धर्मा'त अडकून पडण्याचा धोका सुरेश साबळे यांनी अधोरेखित केलाय. डॉ बाबासाहेबांनी सन्मानित केलेला बौद्ध धम्मच जगासाठी उपयुक्त आहे;पण बाबासाहेबांच्या अपेक्षेप्रमाणे धम्मप्रचार व कार्य झाले नसल्याची लेखकाची खंत अर्थपूर्ण आहे.स्वधर्माच्या आत्मपरीक्षणात्मक नोंदी उणिवांसह करणे साधे काम नसते; पण मोजक्या अनुयायांपैकी सुरेश साबळे आहेत.ज्यांनी हे पवित्र काम केलंय.धम्माच्या चळवळीत युवकांची आघाडी नसल्याने वास्तव धाडसाने साबळे मांडू पाहतात"(पृ.१३) आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक भान म्हणजे अभिजित दिपके यांनी हा मर्मग्राही अनुबंध बांधला आहे आणि या व्यवस्थेला डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची अधिष्ठान दाखवून दिले आहे.तसेच अरंविद सुरवाडे यांचा अभिप्राय असा "परिवर्तन, प्रबोधन, क्रांती या संकल्पना अतिशय बृहद आणि व्यमिश्र असल्या, तरी त्या प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सततच्या प्रयत्नांची आवश्यकता असते.असे प्रयत्न लिखान आणि कृती यातून केले जातात.सुरेश साबळे या दोन्ही पातळ्यांवर, आघाड्यांवर कार्यरत आहेत. या लेखसंग्रहामुळे त्यांच्या वैचारिक बांधिलकीचा दस्तावेज एकत्रितपणे वाचकांना उपलब्ध झाला आहे" (पृ.१८)आयु.साबळे जी हे तीनं-साडेतीन दशकाचे आंबेडकरी चळवळीचा साहित्यिक धुरंधर कार्यकर्ते त्यांनी अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध सकारात्मक विचारधारेची ही मांडणी केली आहे.ख्यातनाम समीक्षक जेष्ठ भाषा संशोधक,रवींद्र इंगळे चावरेकर यांची चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक पाठराखण अशी " वैदिकेत्तर व्यवस्था कायम संघर्षरत असूनही आपल्या प्राचीन इतिहासाचा सार्थ अभिमान बाळगण्यात अपयशी का ठरते? त्याचा विचार केल्यास वैदिक व्यस्थेप्रमाणे वैदिकेत्तर चळवळीच्या कार्यकर्तृत्वाच्या नोंदी व त्याचे दस्तऐवजीकरण करण्यात वैदिकत्तर नेहमीचं कमी पडतात.परिणामत: वैदिकेत्तर सतत चळवळ करीत असूनही या चळवळीचा इतिहास भावी पिढ्यांना उपलब्ध होत नाही.सुरेश साबळेंनी घेतलेल्या या समकालीन चळवळीच्या नोंदी पुढ्यांसाठी समर्थ इतिहासाची भूमिका पार पाडतील,या विषयी शंका नाही "(ब्लर्ब) हा वास्तवतेचा सम्यक दुर दृष्टीचा अनुबंध प्रकाशमय आहे.हा अतिशय समर्पक समृद्ध चळवळीचा साहित्यिक संदर्भ दस्तऐवज झाला आहे. जागतिक किर्तीचे चित्रकार कलकथित श्रीधर अंभोरे दादांचे मुखपृष्ठ,रेखाटने अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक आहे.यामुळे ग्रंथाचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे.श्रध्देय श्रीधर अंभोरे यांचे पावन पदस्पर्शांचे रेखाटन,व पद्मश्री नामदेव ढसाळ यांचीकविता "सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला.आता अंधार यात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे...सूर्यफूले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला.आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे...!“

**पुस्तक:-परिवर्तनवादी चळवळी:-चिंतन आणि प्रबोधन**
**लेखक:-सुरेश साबळे (कवी-लेखक-समीक्षक)**
**प्रकाशक:-युवराज माळी,**
**अथर्व पब्लिकेशन, जळगाव**
**मुखपृष्ठ, रेखाचित्रे:- श्रीधर अंभोरे**
**प्रथमावृती:-२३ सप्टेंबर २४**
**(सत्यशोधक समाज स्थापना)**
**किंमत:-३००/रूपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६


## आठ तोळे सोन्याच्या अंगठ्या व आयफोन शोधून काढण्यात पोलिसांना यश



**दौलताबाद (जावेद अहमद)** : तृतीयपंथी इनाया शेख २४ वर्षीय राहणार डी एंन नगर छत्रपती संभाजी नगर ही आपल्या शुभम राजू खरात राहणार गाडेनगर अकोला यांच्या सोबत खुलताबाद येथे जात होते. पुढे रस्त्यात जात असताना लघुशंका करण्यासाठी दौलताबाद घाटात रस्त्याच्या बाजूला जाऊन थांबले व नजरचुकीने त्यांच्या हातात असलेली पर्स दुसऱ्या दुचाकी च्या हँडल ला अडकून दिली व ती गहाळ झाली. पर्सचा शोधान्यासाठी इकडे तिकडे पाहिले असता मिळून न आल्याने ही बाब दौलताबाद पोलीस यांना माहिती मिळताच या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांनी डी बी पथक पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखेरे, पोलीस अंमलदार खुशाल पाटील, बंडू गोरे, अविनाश बरवंट, सुमेध पवार, महिला पोलीस आरीफा शहा, सातदिवे हे पथक शोध मोहिमेत सहभागी होऊन कामाला लागले कोणतेही पुरावे आणि सी सी फुटेज नसल्याने पर्स चा शोध घेणे फारच अवघड होते पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत असताना गुप्त बातमीदाराने सुमित मिलिद घाटे वय २६ वर्ष राहणार मावसाळा तालुका खुलताबाद याच्या कडे पर्स असल्याचे सांगितले त्या आधारे सुनील घाटे याला विश्वासात घेऊन माहिती घेतली असता त्याने गहाळ झालेली पर्स काढून दिले.

या पर्स मध्ये एक आयफोन व एक एक तोळ्यांच्या आठ अंगठ्या होत्या असा दहा लाखाचे दागिने व मोबाईल फोन होते पोलिसांनी आठ अंगठ्या व एक आयफोन घेऊन इनाया शेख यांना परत केले गहाळ झालेले सोन व मोबाईल फोन परत मिळाला या बद्दल त्यांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले.

## महिला आर्थिक सक्षमीकरणास प्राधान्य; 'उमेद' मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळणार

**मुंबई/बीड (भगवंत पाळवदे)** : ग्रामीण महिलांना केवळ बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रभावी प्रयत्न राज्य शासन विविध माध्यमातून करत आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद'च्या माध्यमातून सक्षणीकरणाचे हे काम ग्रामीण भागात यशस्वीपणे व्यापक स्वरुपात सुरू आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, कृषी निविष्ठांची उपलब्धता आणि विविध व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना शाश्वत उत्पन्नाचे साधन मिळत असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. 'उमेद' अभियानांतर्गत कृषी अवजार बँक आणि कृषी निविष्ठा केंद्र हे दोन महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांना महागडी कृषी यंत्रे स्वतः खरेदी न करता भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, हा कृषी अवजार बँकेचा प्रमुख उद्देश आहे. ४०८ कृषी अवजार बँकांची उभारणी वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांत ४०८ कृषी अवजार बँका स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचा सुमारे ४० हजार ८०० महिला शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. या अवजार बँकांमध्ये विविध कृषिपूरक अवजारांसह ट्रॅक्टरचीही सुविधा उपलब्ध आहे. महिला स्वयंसहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या अवजार बँकांचे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे या सुविधा केवळ यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या केंद्रांपुरत्या मर्यादित न राहता समुदायाच्या मालकीच्या आणि व्यवस्थापनाखालील कृषी सेवा केंद्रे म्हणून विकसित होत आहेत.शेतीचा खर्च कमी; उत्पादकतेला हातभार

महागडी कृषी यंत्रे खरेदी करण्याची गरज नसल्याने महिला शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होत आहे. पेरणी, आंतरमशागत आणि कापणीसारखी कामे आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने वेळेत पूर्ण होत असल्याने शेतीतील कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर अवजारे भाड्याने देण्याच्या माध्यमातून समुदाय आधारित संस्थांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळत आहे. अवजार बँकांच्या व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत. त्यामुळे एका उपक्रमातून महिला शेतकरी, बचत गट आणि स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्था अशा अनेक घटकांना लाभ मिळत आहे.५४ महिला उत्पादक कंपन्यांकडून कृषी निविष्ठांचा पुरवठा कृषी निविष्ठांच्या क्षेत्रातही 'उमेद'च्या माध्यमातून महिलांना नवी संधी उपलब्ध झाली आहे. राज्यातील ५४ महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे बियाणे व खत विक्रीसाठी आवश्यक परवाने उपलब्ध आहेत. या माध्यमातून सुमारे ५४ हजार महिला सभासदांना सेवा दिली जात आहे. महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आपल्या सभासदांची मागणी एकत्रित करून मोठ्या प्रमाणावर बियाणे, खते आणि इतर कृषी निविष्ठांची खरेदी करतात. सामूहिक खरेदीमुळे दर्जेदार निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध करून देण्यास मदत होत आहे. परिणामी शेतकऱ्यांचा निविष्ठांवरील खर्च आणि बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेनेही या उपक्रमाची वाटचाल सुरू आहे. रेशन दुकानापासून वीट निर्मितीपर्यंत

'उमेद' अभियानाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला कृषी क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता विविध व्यवसायांपर्यंत विस्तार दिला आहे. राज्यात स्वयं-सहाय्यता समूहांच्या माध्यमातून रेशन दुकाने, सिमेंट एजन्सी, वीट निर्मिती, केरोसीन एजन्सी आणि टाईल्स निर्मिती यांसारखे व्यवसायही महिलांकडून चालविले जात आहेत. ३२ स्वयं-सहाय्यता समूहांमधील ५८ महिला रेशन दुकाने, तर एका स्वयं-सहाय्यता समूहातील २३ महिला सिमेंट विक्रीचा व्यवसाय सांभाळत आहेत. दोन समूहांमधील २४ महिला वीट निर्मिती व्यवसायात कार्यरत आहेत. याशिवाय दोन महिला केरोसीन एजन्सी, तर दोन महिला टाईल्स निर्मितीचा व्यवसाय चालवत आहेत.बचत गटातून उद्योजकतेकडे

'उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण महिलांचा प्रवास बचत आणि कर्जाच्या चौकटीपलीकडे जाऊन उद्योजकतेकडे होत आहे. व्यवसाय व्यवस्थापन, वित्तीय समावेशन आणि बाजारपेठेशी जोडणी यासाठी संस्थात्मक पाठबळ मिळत असल्याने महिलांची निर्णयक्षमता आणि आर्थिक स्वावलंबन वाढत आहे. ग्रामीण भागातच रोजगार आणि नियमित उत्पन्नाच्या संधी उपलब्ध झाल्याने महिलांच्या कौटुंबिक उत्पन्नाला हातभार लागत आहे. त्याचवेळी गावातील नागरिकांनाही आवश्यक वस्तू आणि सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होत आहेत.

महिला स्वयंसहाय्यता समूहांची सामूहिक ताकद, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला संस्थात्मक पाठबळ यांचा संगम घडवून 'उमेद' अभियान ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच गावच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी देत आहे. शेतीतील यांत्रिकीकरणापासून व्यवसायाच्या व्यवस्थापनापर्यंत महिलांचा वाढता सहभाग हा ग्रामीण महाराष्ट्राच्या बदलत्या आर्थिक चित्राचा महत्त्वपूर्ण भाग ठरत आहे.

## पिनाकेश्वर महादेव मंदिरात महारुद्र अभिषेक संपन्न

**कन्नड (अरुण थोरात)** : कन्नड नांदगाव च्या हद्दीवरती असलेले जातेगाव चे प्रसिद्ध पिनाकेश्वर महादेव मंदिर येथे दि 25 ऑगस्ट रोजी कन्नड च्या आमदार संजनाताई जाधव यांच्या हस्ते अभिषेक संपन्न झाला. निसर्गरम्य जातेगाव डोंगरावरती प्राचीन काळापासून महादेव मंदिर आहे. या मंदिराच्या फार जुना व मोठा इतिहास आहे सदरील मंदिराचे जीर्णोद्धार संत जनार्दन स्वामी यांच्या हस्त झालेला आहे. तर त्या ठिकाणी महंत म्हणून अनेक वर्ष ज्यांच्या आधी पत्त्याखाली मठाधीश गंगा नंदगिरी महाराज यांच्या उपस्थितीत चालू होते. काळांतराने गंगानंदगिरी महाराज हे राज डेहरी आश्रम वरती स्थलांतरित होऊन राज डेरीला एक नवीन आश्रम उद्याच आणला. आजही कन्नड, नांदगाव, नाशिक, बोलठाण, चाळीसगाव,अनेक ठिकाणचे भाविक या ठिकाणी श्रावण महिन्यात नित्यनेमाने महादेवाच्या दर्शनासाठी व अभिषेक साठी येतात. आडगाव येथील गावकरी या ठिकाणी दरवर्षी भंडाऱ्याचा कार्यक्रम करतात आडगावचे माजी सरपंच ज्ञानेश्वर निकम व त्यांचे कुटुंबाच्या वतीने पिनाकेश्वर महादेव मंदिर येथे दर सालाबाद प्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते अनेक लोकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला यांप्रसंगी आ. संजनाताई जाधव, माजी उपसभापती गणेश शिंदे, मार्केट कमिटीचे सभापती डॉ मनोज राठोड, उपसभापती जयश बोरसे, रामेश्वर घनकर, तालुकाप्रमुख नारायण बोडखे, उपसरपंच कल्याण पवार, सुधाकर पवार, माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, प्रवीण जंजाळ, संजय मुचक, सुरेश चव्हाण, माजी उप सभापती गीताराम पवार, रवींद्र अजमेरा, संतोष निकम, नगरसेवक बंटी सुरे, शिवाजी थेटे,आदित्य गर्जे, महादेव भक्त गोकुल राठोड, अक्षय झिमन इत्यादी भाविक उपस्थित होते.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६


# जिल्हापरिषद अध्यक्षांनी बांधावर जाऊन साधला शेतकरी संवाद



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी तालुक्यातील औराळा -जेऊर परिसरातील शेतकरी बांधवांच्या शेतावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी काही शेतकऱ्यांनी मका पिकाच्या बियाण्याबाबत गंभीर तक्रारी मांडल्या, संबंधित बियाण्यांमुळे मका पिकाची अपेक्षित वाढ होत नसल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे व जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली. प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यावर योग्य तोडगा काढण्यासाठी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन यावेळी दिले.यानंतर प्रसिद्ध पिनाकेश्वर महादेव देवस्थान येथे भेट देऊन दर्शन घेत चांगला पाऊस, पीक पाण्यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस जि.प. सदस्य किशोर आबा पवार, जि.प.सदस्या मंजुषा मलदुडे, भाजप जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, जिल्हा सचिव बबनराव बनसोड, मंडलाध्यक्ष ललित सुरासे, किसान मोर्चाचे प्रदेश सचिव प्रकाश अण्णा घुले, मा.पं.स. उपसभापती सुनील निकम, महेश मलदुडे, अरुण थोरात, विलास भोजने, सुदाम पवार, भावेश शिंदे, दिनकर दाभाडे, रतन मधे, विलास पवार, तसेच जेऊर येथील बाबासाहेब पवार, गणेश पवार, महेश पवार, सह पदाधिकारी, शेतकरी बांधव व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिशुगृहातील बालकांच्या नातेवाईकांचा शोध; ३० दिवसांनंतर दत्तक निर्णय





**बीड, (भगवंत पाळवदे) :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत दत्तक प्रक्रियेच्या अनुषंगाने एक महत्त्वाची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिशुगृहात दाखल असलेल्या बालिका आयारा आणि बालक भार्गव या दोन बालकांच्या पालकांचा अथवा कायदेशीर नातेवाईकांचा शोध घेतला जात असून त्यांच्यासाठी ही जाहीर प्रसिद्धी देण्यात आली आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बालिका आयारा ही बालिका १७ एप्रिल २०२५ रोजी शिशुगृहात दाखल झाली आहे. तर बालक भार्गव हा बालक २३ डिसेंबर २०२४ रोजी शिशुगृहात दाखल झाला आहे. या दोन्ही बालकांची माहिती आणि छायाचित्रे दत्तक प्रक्रियेसाठी पाठविण्यात आली आहेत. तत्पूर्वी कायद्यानुसार त्यांच्या मूळ पालकांचा किंवा नातेवाईकांचा शोध घेणे आवश्यक असल्याने प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित बालकांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी आवश्यक पुराव्यांसह कार्यालयांशी संपर्क साधावा. जर दिलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत कोणीही नातेवाईक समोर आले नाहीत, तर बालकल्याण समिती या बालकांच्या भविष्याबाबत आणि दत्तक प्रक्रियेबाबत कायद्यानुसार योग्य तो पुढील निर्णय घेईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६

# राखीच्या धाग्यापलीकडचे बहिण-भावाचे नाते

रक्षाबंधन हा बहिण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा, विश्वास आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. यंदा 28 ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे होत आहे. या दिवसाकडे धार्मिक परंपरा किंवा कर्मकांडाच्या चौकटीतून न पाहता, मानवी नात्यांच्या भावविश्वातून पाहिले तर त्याचे महत्त्व अधिक व्यापकपणे जाणवते. बहिण आणि भाऊ हे नाते जन्मतः मिळते; परंतु त्यातील प्रेम, विश्वास आणि आपलेपणा आयुष्यभर जपावा लागतो. बालपणीच्या निरागस आठवणींपासून ते प्रौढ आयुष्यातील जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते अनेक अनुभवांतून समृद्ध होत जाते. कधी त्यात खोडकरपणा असतो, कधी भांडणे असतात, कधी रुसवे-फुगवे असतात, तर कधी कोणत्याही शब्दांशिवाय एकमेकांना समजून घेणारी विलक्षण जवळीक असते. म्हणूनच बहिण-भावाचे नाते हे केवळ रक्तसंबंध नसून भावनिक सोबतीचे आणि आयुष्यभर टिकणाऱ्या विश्वासाचे नाते आहे.बहिण-भावाच्या नात्याची सुरुवात बहुतेकदा बालपणाच्या अंगणात होते. एकाच घरात वाढताना दोघांच्या आयुष्यातील असंख्य क्षण एकमेकांशी जोडलेले असतात. खेळताना झालेले भांडण, खाऊसाठी केलेली धावपळ, शाळेत जाण्याची लगबग, गृहपाठ टाळण्यासाठी केलेली कारणे, पालकांकडून मिळालेली कौतुकाची थाप आणि कधी झालेली रागाची बोलणी या सर्व आठवणी भावंडांच्या मनात साठत जातात. बालपणी एखादी छोटीशी वस्तू मिळाली नाही म्हणून झालेले भांडण त्या क्षणी मोठे वाटते; परंतु काही वेळाने तेच दोघे पुन्हा एकत्र खेळू लागतात. या छोट्या घटनांमधून नात्याचा एक महत्त्वाचा गुण दिसून येतो. मनात राग असला तरी मनात दुरावा कायम राहत नाही. बालपणातील हे सहज प्रेम पुढे आयुष्याच्या अनेक वळणांवर भावंडांना एकमेकांशी जोडून ठेवते.बहिण-भावाच्या नात्यातील सर्वांत सुंदर गोष्ट म्हणजे त्यातील सहजता. या नात्यात स्वतःला वेगळे दाखवण्याची गरज नसते. आपली चूक, आपला राग, आपले दुःख, आपला आनंद किंवा आपली चिंता मनमोकळेपणाने व्यक्त करता येते. बाहेरच्या जगात प्रत्येक व्यक्तीला आपली प्रतिमा जपावी लागते; परंतु भावंडांसमोर ती प्रतिमा बाजूला ठेवून मनातील खरी भावना व्यक्त करता येते. बहीण भावाला त्याच्या चुका थेट सांगू शकते आणि भाऊही बहिणीला तिच्या निर्णयांबद्दल प्रामाणिक सल्ला देऊ शकतो. या मोकळेपणामुळे नाते अधिक घट्ट होते. अनेकदा आयुष्यातील एखाद्या कठीण प्रसंगी मित्रांपेक्षा आधी आठवण येते ती भावंडांची. कारण या नात्यात मदतीपूर्वीच विश्वास असतो.बालपण मागे पडले की भावंडांच्या आयुष्यात बदल सुरू होतात. शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाणे, नोकरीसाठी शहर बदलणे, विवाहानंतर स्वतंत्र कुटुंब निर्माण करणे किंवा परदेशात स्थायिक होणे यामुळे एकत्र राहण्याचे दिवस संपतात. पूर्वी दररोज होणारा संवाद आता आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा होऊ शकतो. एकाच घरात वाढलेली भावंडे कधी कधी हजारो किलोमीटर अंतरावर राहू लागतात. मात्र भौगोलिक अंतर वाढले म्हणून भावनिक अंतर वाढायलाच हवे असे नाही. उलट, दूर गेल्यावर एकमेकांची आठवण अधिक तीव्र होते. बालपणीच्या आठवणी, कुटुंबातील प्रसंग आणि एकत्र घालवलेला काळ या आठवणी भावंडांना मनाने जोडून ठेवतात.आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या कामाच्या आणि वैयक्तिक जबाबदाऱ्यांच्या व्यापात अडकलेली आहे. अशा परिस्थितीत नाती जपण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ देणे आवश्यक झाले आहे. बहिण-भावाच्या नात्यासाठी महागड्या भेटवस्तूंची गरज नाही. कधी अचानक केलेला दूरध्वनी, मनापासून विचारलेली विचारपूस, एखादा जुना प्रसंग आठवून केलेली गंमत किंवा संकटाच्या वेळी दिलेला धीर हे अधिक मौल्यवान असते. ‘तू कसा आहेस?’ किंवा ‘तुला काही मदत हवी आहे का?’ एवढे साधे शब्दही नात्याला आधार देतात. नात्याची किंमत भेटवस्तूच्या किमतीने ठरत नाही; ती एकमेकांना दिलेल्या वेळेने, समजून घेण्याच्या वृत्तीने आणि कठीण प्रसंगी दिलेल्या साथीने ठरते.बहिण-भावाचे नाते आजच्या काळात समानतेच्या नव्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. पूर्वी भावाची भूमिका केवळ बहिणीचे संरक्षण करणारा अशी मांडली जात असे. आज मात्र या नात्याचा अर्थ त्यापेक्षा व्यापक झाला आहे. बहीणही भावाच्या आयुष्यात तितकीच आधार देणारी व्यक्ती असते. भावाला अडचण आली तर बहीण त्याच्या पाठीशी उभी राहते आणि बहिणीसमोर संकट आले तर भाऊ तिच्यासोबत राहतो. ही साथ एकतर्फी नसून परस्परांची असली पाहिजे. प्रेमामध्ये अधिकार असू शकतो; परंतु नियंत्रण नसावे. काळजी असावी; परंतु बंधने नसावीत. सल्ला असावा; परंतु निर्णय लादण्याची वृत्ती नसावी. या समतोलातूनच आधुनिक बहिण-भावाचे नाते अधिक परिपक्व होऊ शकते.विशेषतः बहिणीच्या शिक्षण, करिअर आणि स्वावलंबनाच्या वाटचालीत भावाची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. बहिणीने काय शिकावे, कोणते काम करावे, कुठे राहावे किंवा कोणते निर्णय घ्यावेत यावर अधिकार गाजवण्याऐवजी तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे ही खरी साथ आहे. तिच्या यशाचा आनंद स्वतःच्या यशासारखा मानणे आणि तिच्या अपयशाच्या वेळी तिला खंबीरपणे उभे करणे हे भावाच्या प्रेमाचे अधिक सुंदर रूप आहे. त्याचप्रमाणे भावाच्या आयुष्यातील संघर्ष, आर्थिक अडचणी, करिअरमधील चढ-उतार किंवा भावनिक ताण समजून घेऊन त्याला दोष न देता ऐकून घेणे ही बहिणीचीही महत्त्वाची भूमिका आहे. दोघांनीही एकमेकांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले पाहिजे.बहिण-भावाच्या नात्यात संवादाला विशेष महत्त्व आहे. अनेक गैरसमज संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. ‘तो स्वतःहून समजून घेईल’ किंवा ‘ती माझ्या मनातील भावना ओळखेल’ असे गृहीत धरल्याने कधी कधी मनात अंतर वाढते. त्याऐवजी आपल्याला काय वाटते हे स्पष्टपणे सांगणे, समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि मतभेद झाले तरी नाते तोडण्याऐवजी संवाद कायम ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक भावंडाची जीवनशैली, विचारसरणी आणि निर्णय घेण्याची पद्धत वेगळी असू शकते. मतभिन्नता म्हणजे नात्यातील तुटलेपणा नव्हे. परस्परांच्या वेगळेपणाचा स्वीकार करणे हेच प्रगल्भ नात्याचे लक्षण आहे.विवाहानंतर बहिणीचे आयुष्य अनेक बाबतींत बदलते. ती नव्या कुटुंबात प्रवेश करते, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारते आणि अनेकदा वेगळ्या शहरात राहू लागते. अशा वेळी माहेरच्या भावंडांशी असलेले नाते तिच्यासाठी भावनिक आधार ठरू शकते. मात्र हा आधार तिच्या वैयक्तिक आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणारा नसावा. बहिणीच्या जीवनातील निर्णयांचा सन्मान करणे आणि तिच्या गरजेच्या वेळी तिच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे विवाहित बहिणीनेही भावाच्या आयुष्यातील बदल समजून घेत त्याच्या जबाबदाऱ्यांचा आदर केला पाहिजे. नात्यातील जवळीक टिकवायची असेल तर अधिकारापेक्षा समजूतदारपणाला महत्त्व द्यावे लागते.भावंडांच्या नात्यात कधी आर्थिक मदतीची गरजही निर्माण होते. एखाद्या भावंडाला शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा अन्य जीवनप्रसंगी मदत लागते. अशा वेळी शक्य असेल तेव्हा मदतीचा हात पुढे करणे ही नात्याची ताकद आहे. मात्र आर्थिक व्यवहारांमुळे प्रेमाचे मोजमाप होऊ नये. कोणाने किती खर्च केला, कोणाने किती भेट दिली किंवा कोणाने किती मदत केली याची हिशेबपत्रिका नात्यात ठेवली तर भावनिक जवळीक कमी होऊ शकते. नात्याची श्रीमंती पैशांत नसते; ती विश्वासात असते. संकटाच्या वेळी ‘तू एकटा नाहीस’ किंवा ‘तू एकटी नाहीस’ हा दिलासा अनेकदा कोणत्याही आर्थिक मदतीपेक्षा मोठा आधार ठरतो.रक्षाबंधनाच्या निमित्ताने भावंडांनी आपल्या नात्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. वर्षभर व्यस्त राहिल्यानंतर या दिवशी भेटणे हा एक सुंदर योग असतो; परंतु त्यापलीकडे या दिवसाचा अर्थ अधिक मोठा आहे. एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे, झालेल्या गैरसमजांवर पडदा टाकणे आणि भविष्यातील आयुष्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देणे हे या दिवसाचे खरे सौंदर्य ठरू शकते. राखी हा केवळ मनगटावर बांधला जाणारा धागा नसून भावनिक नात्याची आठवण करून देणारे प्रतीक आहे. त्या धाग्याला अर्थ प्राप्त होतो तो परस्परांच्या मनात असलेल्या प्रेमामुळे.आज डिजिटल माध्यमांमुळे दूर असलेल्या भावंडांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. व्हिडिओ संभाषण, संदेश आणि दूरध्वनी यामुळे अंतर काही प्रमाणात कमी करता येते. परंतु तंत्रज्ञान हे नात्याचा पर्याय नाही; ते नाते जपण्याचे साधन आहे. सामाजिक माध्यमांवर एकमेकांसोबतचे छायाचित्र प्रसिद्ध करणे किंवा शुभेच्छा देणे सुंदर आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष आयुष्यात एकमेकांसाठी उपलब्ध असणे. एखाद्या भावंडाच्या यशावेळी मनापासून आनंद व्यक्त करणे आणि अपयशाच्या वेळी त्याला कमी लेखण्याऐवजी धीर देणे यामुळे नाते अधिक अर्थपूर्ण होते. सार्वजनिक प्रदर्शनापेक्षा खासगी आपुलकी अधिक मौल्यवान असते.बहिण-भावाच्या नात्यातील आठवणी हा एक वेगळाच भावनिक ठेवा असतो. घरातील जुन्या वस्तू, शाळेची छायाचित्रे, बालपणीचे खेळ, एकत्र केलेल्या सहली, पालकांनी दिलेल्या सूचना, छोट्या कारणांवरून झालेले वाद आणि नंतर झालेली मैत्री या सर्व गोष्टी काळ पुढे गेल्यानंतर अमूल्य वाटू लागतात. बालपणी ज्यांच्यासोबत वेळ घालवणे अगदी स्वाभाविक वाटत होते, त्याच क्षणांची पुढे आठवण येते. म्हणूनच भावंडांनी केवळ जुन्या आठवणी जपण्यापेक्षा नव्या आठवणीही निर्माण कराव्यात. एकत्र वेळ घालवणे, कुटुंबीयांसोबत भेटणे आणि परस्परांच्या आयुष्यात सहभागी राहणे यामुळे नाते सतत नव्याने फुलत राहते.या नात्यात क्षमाशीलतेचे महत्त्वही मोठे आहे. भावंडे जवळची असल्यामुळे एकमेकांकडून अपेक्षाही मोठ्या असतात. त्यामुळे कधी शब्द लागतात, गैरसमज होतात किंवा मन दुखावले जाते. परंतु प्रत्येक मतभेदाला कायमचा दुरावा बनू देणे योग्य नाही. नाते टिकवण्यासाठी कधी स्वतःची चूक मान्य करावी लागते, कधी माफी मागावी लागते आणि कधी समोरच्याला माफ करावे लागते. ‘मीच बरोबर’ या भूमिकेपेक्षा ‘आपले नाते महत्त्वाचे आहे’ ही भावना अधिक मोठी असली पाहिजे. नात्यातील प्रेम टिकवण्यासाठी अहंकाराला थोडे मागे ठेवावे लागते.बहिण-भावाचे नाते आपल्याला माणूस म्हणून अधिक संवेदनशील बनवते. दुसऱ्याची काळजी घेणे, त्याच्या भावनांचा आदर करणे, त्याच्या आनंदात सहभागी होणे आणि संकटात त्याला आधार देणे या मूल्यांची सुरुवात अनेकदा कुटुंबातील नात्यांपासूनच होते. म्हणूनच या नात्यातील प्रेम केवळ दोन व्यक्तींमध्ये मर्यादित राहत नाही; ते संपूर्ण कुटुंबाच्या वातावरणावर परिणाम करते. परस्पर सन्मान आणि समानतेवर आधारलेली भावंडे पुढे समाजातील इतर नात्यांकडेही अधिक संवेदनशीलतेने पाहू शकतात. त्यामुळे बहिण-भावाचे नाते हे केवळ वैयक्तिक नाते नसून मानवी मूल्यांची शाळाही आहे.रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधावी, भावाने बहिणीला प्रेमाने भेट द्यावी, एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात; परंतु या बाह्य कृतींपेक्षा त्या मागील भावना अधिक महत्त्वाच्या आहेत. बहिणीच्या स्वप्नांना बळ देणे, भावाच्या संघर्षांना समजून घेणे, एकमेकांच्या निर्णयांचा आदर करणे, मतभेदांमध्ये संवाद साधणे आणि गरजेच्या वेळी निःस्वार्थपणे साथ देणे हा या नात्याचा खरा उत्सव आहे. नात्याचे सौंदर्य एका दिवसापुरते मर्यादित नसते. रक्षाबंधनाचा दिवस त्या नात्याची जाणीव अधिक तीव्र करून देतो; मात्र त्यातील प्रेम वर्षभर जगले गेले पाहिजे.आजच्या काळात नात्यांमध्ये वाढणारा ताण, धावपळ आणि वैयक्तिक आयुष्याभोवती केंद्रित होत जाणारी जीवनशैली पाहता बहिण-भावाच्या नात्याची जपणूक अधिक आवश्यक आहे. भावंडे एकमेकांची स्पर्धक नसून सहप्रवासी असतात. एका भावंडाचे यश दुसऱ्याच्या अपयशाचे कारण नसते. उलट, एकमेकांच्या प्रगतीत आनंद मानणे आणि परस्परांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे ही नात्याची खरी उंची आहे. तुलना, मत्सर आणि अहंकार यांना दूर ठेवून सहकार्य आणि आपुलकी स्वीकारली तर भावंडांचे नाते अधिक आनंददायी बनते.शेवटी, बहिण-भावाचे नाते हे आयुष्याच्या प्रवासातील एक अनमोल सोबत आहे. बालपणी एकाच घराच्या छताखाली सुरू झालेला हा प्रवास पुढे वेगवेगळ्या दिशांनी जाऊ शकतो; परंतु मनातील आपलेपणाचा धागा तुटण्याची गरज नाही. काळ बदलतो, माणसे बदलतात, परिस्थिती बदलते आणि जबाबदाऱ्या वाढतात; तरीही बालपणीचा भाऊ आणि बालपणीची बहीण मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत राहतात. म्हणूनच 28 ऑगस्टच्या रक्षाबंधनानिमित्त राखीच्या धाग्यापेक्षा त्या धाग्याशी जोडलेले प्रेम अधिक महत्त्वाचे मानू या. एकमेकांच्या स्वातंत्र्याचा सन्मान, स्वप्नांना प्रोत्साहन, सुख-दुःखात साथ, मनमोकळा संवाद आणि आयुष्यभराचा विश्वास या मूल्यांनी बहिण-भावाचे नाते अधिक समृद्ध करू या. कारण शेवटी राखी मनगटावर बांधली जाते; पण तिचा खरा धागा मनामध्ये जुळलेला असतो. तो धागा प्रेमाचा, आठवणींचा आणि विश्वासाचा असतो—आणि म्हणूनच तो काळाच्या कोणत्याही अंतरापेक्षा अधिक मजबूत असतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com